VOL. 4 | ISSUE 2 | FEB. 2018
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197 (IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**
On the Occasion of One Day International Conference On

## RECENT ADVANCES IN LANGUAGES, LITERATURE AND SOCIAL SCIENCES

17th February, 2018

**(BOOK- 1)**

*Guest Editors*
**Prof. G. N. Sonwane**
**Dr. Shirish Kadu**

ORGANIZED BY
MGEWS
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN, DIST. THANE & NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF MULTI-DISCIPLINARY STUDIES, PARBHANI**

www.newmanpublication.com

## CONTENTS


| | | |
|---|---|---|
| 1. मानवी हस्तक्षेप, जागतिक तापमान वाढ आणि परिणाम | प्रा.बालाजी आर. गुरूडे<br>प्रा. डॉ. प्रकाश के. मोरखंडे | 06 |
| 2. स्वामी विवेकानंदाचा मानवतावादी दृष्टीकोण | प्रा.माणिक एम. कदम | 10 |
| 3. पाश्चिमात्य विचारांचे निर्माते – सॉक्रेटिस | प्रा.राजेश कांबळे | 12 |
| 4. "कहार जमातीची" दशा आणि दिशा | पांडव संदीप राजाभाऊ | 14 |
| 5. पंचायत राज व्यवस्थेतील महिलांचा सहभाग ...... | डॉ.रामराज गावंडे | 17 |
| 6. जागतिकीकरणाचे परिणाम | डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर | 19 |
| 7. बालगृहातील दुर्धर आजारग्रस्त बालकांचा समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून अभ्यास | डॉ. प्रमिला भुजाडे | 22 |
| 8. आधुनिक काळात ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य : एक वास्तविकता | प्रा.डॉ.अन्सारी एस.जी. | 26 |
| 9. बालकामगार कायदे, आणि बालकामगारांची स्थिती | डॉ. आहिरे पी. बी<br>प्रा. सिताराम के. मोगल | 28 |
| 10. हुंडाबळी नैतिक समस्या | डॉ. आंबटकर व्हि. ओ. | 30 |
| 11. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत मुस्लीमांचे योगदान | प्रा.डॉ.अनिल ठाकरे | 33 |
| 12. मानवाधिकार: मानवी जिवनातील मुलभूत अधिकार | आकाष शेषराव बांगर | 35 |
| 13. ग्रामीण शिक्षणावर माहिती तंत्रज्ञानाचा झालेला परिणाम | कु. महाजन सविता प्र. | 38 |
| 14. ग्रथांलयातिल अमुद्रित साहित्याचे व्यवस्थापन | राजकुमार ग.बोंडे | 41 |
| 15. जागतिकीकरणाचे समाजव्यवस्थेवर होणारे परिणाम | डॉ.सुरेखा वैजनाथराव दाडगे | 46 |
| 16. भारतातील महिला सबलीकरण व राजकारण | डॉ.ढाले एस.यु. | 48 |
| 17. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संघटनाविषयक विचार | गायकवाड प्रतिमा बाळासाहेब | 51 |
| 18. कुतुबशाही लढाया व युध्दपध्दती | श्री मदन अशोकराव जाधव | 53 |
| 19. भारतातील बदलती ग्रामीण समाजव्यवस्था | डॉ. बळीराम प. अवचार | 55 |
| 20. माहिती आणि समाज संकल्पना | अतुल दत्तु जगताप | 57 |
| 21. भारत और आसियान | डॉ. अनंत मदन आवटी | 61 |
| 22. जैन धर्मियांचे महान तीर्थक्षेत्र: फलटण | डॉ.संतोष तुकाराम कदम | 65 |
| 23. भारतीय संगीत पास्त्रातील एक अश्टपैलू व्यक्तीमत्व डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग | जयश्री वि. कडू<br>डॉ. शिरीश कडू | 68 |
| 24. भारतीय अर्थव्यवस्था आणि शेती विकास | डॉ. विजय एच नागरे | 69 |
| 25. डॉ. साहेब खंदारे यांचे "व्यक्तिगतग्रंथालय" | डॉ. घ.ना.पांचाळ | 72 |
| 26. निवडणूका आणि मतदार वर्तन | प्रा.डॉ. राहुल पंडित | 74 |
| 27. 'फास्टफुड सेवनाचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. पुंडगे भिमराव दलितराव | 76 |
| 28. भारत : रोकड विरहीत अर्थव्यवस्था- साधने, सवलती फायदे व दक्षता | डॉ.रोडे दिगंबर भगवानराव | 77 |
| ✓ 29. दहशतवादाचे बदलते स्वरूप | प्रा.भाऊसाहेब सांगळे | 80 |
| 30. भाषेच्या विकासातील शालेय अभ्यासक्रमाची भूमिका | प्रविण चंद्रकांत इंगोले | 83 |
| 31. पराक्रमी महार जात | डॉ. प्रकाश संभाजी वाघमारे | 85 |
| 32. महिला आणि चाळीशीतील आरोग्य | सय्यद आफरोज अहेमद | 89 |
| 33. नागपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींमध्ये ग्राहक संरक्षणाबद्दल असलेली जागरूकता ... | प्रा. कविता आर. बोरकर | 91 |
| 34. मध्ययुगीन समतासुर्य – महात्मा बसवेश्वर | प्रा. डॉ. डी. पी. हिंगमिरे | 100 |
| 35. आधुनिक काळातील ज्येष्ठांच्या समस्या : धोरण व उपाय | कु.शिखा जगदीश शर्मा | 103 |
| 36. राष्ट्रीय चळवळीत विदर्भाचे योगदान 1885–1920 / | डॉ. उज्वला एस. साळवे | 105 |
| 37. महिलांचे मानसिक आरोग्य | अश्विनी संतोष बळसाणे | 107 |
| 38. इयत्ता सातवीच्या विज्ञान विषयासाठी बहुआयामी पृच्छाधारित अध्ययन पध्दतीचा परिणामकारकतेचा अभ्यास | प्राजक्ता मेढेकर<br>डॉ. मृदुला रानडे | 112 |
| 39. उत्तर भारतीय संगीत के परिप्रेक्ष्य में फ्यूजन संगीत और उसके विविध प्रकार/श्रीमती विजल पटेल | डॉ अनया थत्ते | 118 |

**29**

# दहशतवादाचे बदलते स्वरूप

**प्रा.भाऊसाहेब सांगळे.**
इतिहास विभागप्रमुख
अण्णासाहेब आवटे कॉलेज,मंचर. मो. ९४२२७५९९६५.

**प्रस्तावना :** दहशतवादाचा उदय प्राचीन काळातच झालेला दिसतो. सिंधू, इजिप्शियन व अॅसीरीयन संस्कृतीत राजकीय दहशतवादाची बीजे आढळतात. ग्रीक संस्कृतीत Tyrants ची कारकीर्द प्रसिध्द् आहे. रोमन साम्राज्यात दुरवरील प्रांतात प्रजेला दहशतवादी अत्याचारांना तोंड द्यावे लागले होते. गुलामांना अत्यंत कुर वागविण्यात येत असे. मध्ययुगातील नादिरशहा, तैमुरलंग हे दहशतवादी राज्यकर्तेच होते. सरंजामशाही दहशतीवरच राबविली गेली. फ्रान्सचा सम्राट तर नेहमी म्हणत असे 'मी म्हणजे राज्य' रोबोस्पिअरने शेकडो लोकांना गिलोटीनव्दारे यमसदनी पाठविले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात साम्यवाद, अराजकतावाद, नाझीवाद, फॅसिस्ट विचारसरणीचा प्रभाव जाणवू लागला. त्यामुळे राजकीय दहशतवादाला खतपाणी घातले गेले. याचा भिषण परिणाम म्हणजे पहिले व दुसरे महायुध्द् हिटलर, स्टॅलीन, मुसोलिनी, जनरल फ्रॅको या दहशतवादी विचारसरणीच्या नेत्यांचा उदय याच काळात झाला. त्यांच्या पाशवी, सैतानी, क्रुर कृत्यांनी जगाला जबरदस्त मानसिक हादरा दिला. एकविसाव्या शतकात दहशतवादाचा प्रसार जगात सर्वत्र झालेला दिसतो आहे. भरतीय उपखंड व मध्यपूर्वेत तर दहशतवादाने मोठे थैमान घातलेले आहे. या दहशतवादाचे आस्तित्व फार प्राचीन काळापासुन आहे. मात्र त्याचे स्वरूप काळानुरूप कसे बदलत गेले. याची मांडणी सदर शोधनिबंधात केली आहे.

## प्राचीन कालखंड –

प्राचीन काळातही राजकीय दहशतवादाचे भूत कोणत्या ना कोणत्या स्वरूपात लोकांच्या मानगुटीवर बसले होते. याची साक्ष इतिहासातून ठिकठिकाणी पहावयास मिळते. सिंधू, इजिप्शियन व अॅसीरीयन संस्कृतीत त्याचे मुळ सापडते. इ.स. पूर्व १५०० मध्ये भारतावर आर्यांनी जी आक्रमणे केली ती येथील अनार्यांवर दहशत बसविण्यासाठीच केली. आर्यांनी अनार्यांना दहशतीच्या जोरावरच दास बनविले. सप्तसिंधूच्या खोऱ्यात आपले वर्चस्व प्रस्थापित केले. मौर्यांनी प्राचीन काळात बलाढय साम्राज्य निर्माण करून एकछत्री अंमल प्रस्थापित केला होता. पुढील काळात ग्रीकांनी मौर्यांवरती जे आक्रमण केले ते मौर्यांच्या पाडावासाठी कारणीभूत ठरलेले दिसते. त्या आक्रमणाचे नेतृत्व डिमेट्रीएस याने केले होते. त्याच्या बरोबर सेनापती मिनेंडर होता. त्यांनी गंगा यमुनेच्या त्रिभूज प्रदेशात गांधारपर्यंत मजल मारली होती. ग्रीकांच्या आक्रमणाचा परिणाम येथील शिल्पकला, स्थापत्य कलेवरही झाला.[२]

ग्रीकानंतर पार्थियन व शक या दोन परकीय टोळयांनी भारतावर आक्रमण केले. शक टोळया सिंधू नदीच्या खोऱ्यात स्थायीक झाल्या. पुढे त्यांनी भारतात छोटी छोटी राज्य प्रस्थापित केली. उदा. सौराष्ट्र, पंजाब, सिंध. पार्थियन राजा वोनोनेस, गोंडोफेरनेस यांनी या आक्रमणाचे नेतृत्व केले.[३] कुशाण या मध्यआशियातील टोळयांनीही भारताच्या वायव्य भागावर आक्रमण करून शकांची राज्य काबीज केली. कुशाण राजा कॅडफिसेस पहिला, विम कॅडफिसेस, कनिष्क यांनी भारताच्या बऱ्याच मोठया प्रदेशावर दहशत निर्माण केली होती. प्राचीन काळात आर्य, ग्रीक, शक, कुशाण, हुन या परकीय टोळयांनी भारतात दहशत निर्माण करूनच आपली राज्य प्रस्थापित केली होती.

## मध्ययुगीन काळ –

इ.स. ७१२ मध्ये महमद बिन कासीम या पहिल्या अरब मुस्लिम राजाने भारतावर स्वारी केली. देवल नगरात काशिमने हिंदू सैनिक व स्थानिक जनतेचा दहशतीने सामना केला राओर, अलोर, मुलतान हे प्रदेश काशिमने जिंकून घेतले. सिंध विजयानंतर अरबांचा भारतात साम्राज्यविस्तार वाढतच गेला.[४] गझनीच्या महमुदाने भारतावर १७ स्वाऱ्या करून (१००१ – १०२६) दहशतीने येथील संपत्तीची खुप मोठी लुट केली. अनेक मंदीरांचा विध्वंस केला. ११७५ पासून मुहम्मद घोरीच्या स्वाऱ्या भारतावर सुरू झाल्या. तराईनच्या लढयात हिंदू राजा पृथ्वीराज चाहमानवर विजय मिळवून मोठा प्रदेश हस्तगत केला.[५]

मुहम्मद घोरीने भारतातील आपला सुभेदार म्हणून कुतुबुद्दीन ऐबकाला नेमले. मुहम्मदाच्या मृत्यूनंतर कुतुबुद्दीनने दिल्लीला आपले स्वतंत्र राज्य स्थापून स्वतःला १२०६ मध्ये येथील सुल्तान म्हणून जाहीर केले.[६]

तुर्की आक्रमकांनी अशा प्रकारे दहशतीने भारतात आपली सत्ता प्रस्थापित केली. जी पुढे ६०० वर्षांपर्यंत चालली होती.

## आधुनिक काळ –

भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या त्यांच्या अंगरक्षकांनी ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी केली. त्यामुळे सर्व जगात खळबळ माजली. अमृतसरमधील सुवर्ण मंदीरात दह

 ISSN: 2454-5503 Impact Factor: 4.197 (IIJIF)

बसलेल्या शीख अतिरेक्यांच्या बंदोबस्तासाठी इंदिरा गांधींनी लष्कराला कारवाईचा आदेश दिला होता. त्याचा परिणाम त्यांची गोळया घालून खलिस्तानवाद्यांकडून हत्या झाली.

राजीव गांधीची हत्या – एल.टी टी. ई. च्या आत्मघातकी पथकातील धानूने शरीराला लपेटलेल्या बॉम्बचा स्फोट घडवून आणून राजीवजींची हत्या केली. कारण १९८७ मध्ये राजीवजींनी श्रीलंकेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारतीय सैन्य पाठविले होते. या लष्करी कारवाईत एल.टी. टी. ई. ने बरेच बंडखोर मारले गेले होते.[7] विमान अपहरण भारतीय प्रवासी विमान सेवेचे फ्लाईट आय.सी. ८१४ हे विमान काठमांडूहून नवी दिल्लीत येत असता २४ डिसेंबर १९९९ रोजी अपहरण करून प्रथम अमृतसर तेथून लाहोर नंतर कंदहार येथे नेले पुढे दुबईला नेले वाटेत रूपीन कटयाळ या प्रवाशाला ठार केले. कारण दहशतवाद्यांना हरकत उल जिहादी इस्लामी (एन.यु.जे.आय.) चा संस्थापक मौलाना मसूद अझरची भारतीय तुरूंगातून सुटका हवा होती.[8] खलिस्तानवादी – आधुनिक 'दल खालसा' या गटाची स्थापना शीख पंथातील मतभेदांमुळे झाली. त्याला अतिरेकी गटाने पाठींबा दिला. पुढे शीख विद्यार्थी महासंघानेही पाठींबा दिला. अमृतसरचे पावित्र्य राखण्यासाठी वेगळे कायदे करण्याची मागणी केली. परिणामी हिंदू व शीखांमध्ये तणाव निर्माण झाला. संत भिंद्रानवाले यांनीही खलिस्तान चळवळीस पाठींबा देऊन अमृतसर मध्ये आंदोलन सुरू केले. हे आंदोलन सुवर्णमंदीराच्या आतील भागात केले जात होते.तेथून अतिरेकी कारवाया १९८२ पासून सुरू झाल्या. दोन विमानाचे अपहरण करण्याचा प्रयत्न झाला. पंजाबच्या मुख्यमंत्र्यांच्या हत्येचा प्रयत्न झाला तर २३ एप्रिल १९८३ रोजी पोलिस मुख्याधिकारी अखरसिंग अखाल यांची हत्या केली. या सर्व कारवायांबद्दल भिंद्रानवाले व त्यांच्या अनुयायांना जबाबदार धरले.

ऑपरेशन ब्लू स्टार भिंद्रानवाले यांना अटक करण्यासाठी सरकारने वॉरंट काढले मात्र ते सुवर्णमंदीरात असल्याने त्यांना अअक करता येत नव्हती. म्हणून सरकारने ५ जून १९८४ रोजी ऑपरेशन ब्लू स्टारला प्रारंभ केला. तेव्हा लष्करप्रमुख ए.एस वैद्य होते. रणगाडयाच्या ताफ्यासह लष्कराने सुवर्ण मंदीरावर हल्ला केला. मंदीराची मोठी पडझड झाली. संत भिंद्रानवाले मारले गेले.७०० सैनिक व ५००० नागरिक ठार झाले. या घटनेने जगभर मोठी खळबळ उडाली. यानंतर दहशतवादाला मोठे उधाण आले. हिंदू शीख दंगलीने कहर केला. अनेक नागरिक मृत्युमुखी पडले.३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिराजींची हत्या त्यांच्या दोन अंगरक्षकांनी केली. खलिस्तान कमांडो फोर्स व शीख महासंघाचे हे कृत्य होते.[9] १३ मार्च १९९३ रोजी मुंबई शहरातील स्टॉक एक्सचेंज एअर इंडिया इमारतीवर जबरदस्त बॉंब हल्ले करण्यात आले. याचा उद्देश प्रचंड नासधूस करणे, सर्वत्र घबराट निर्माण करणे व आर्थिक व्यवहार ठप्प व्हावे हा होता. हा हल्ला पाकिस्तानच्या आय.एस.आय. या गुप्तहेर संघटनेच्या नियोजनामुळे झाला होता. दाऊद इब्राहीमचा त्यात हात होता. १३ डिसेंबर २००१ रोजी ५ अतिरेक्यांनी हल्ला केला. दहशतवादी हल्ले २४ ऑक्टोबर २००२ रोजी गुजरातमधील अक्षरधाम मंदिरावर दोन कोवळया तरूण दहशतवाद्यांनी केला. जम्मूमधील रघुनाथ व शंकर या दोन प्रसिध्द मंदीरावर हल्ला २४ नोव्हेंबर २००२ मध्ये झाला.

पाक दहशतवादी गटाने २० ऑक्टोबर २००५ रोजी दिल्ली शहरात एका मागोमाग एक अनेक स्फोट करून ६३ माणसे मारली. ११ जुलै २००६ रोजी ११ पाक दहशतवादी व तीन भारतीय अतिरेक्यांनी २० किलो आर.डी.एक्स. स्फोटकाने बॉंब तयार करून लोकल ट्रेनच्या पहिल्या वर्गाच्या डब्यात ठेवले. त्यात १०० लोक मृत्युमुखी पडले, ७००च्या वर जखमी झाले.

### भारतीय उपखंडातील दहशतवाद –

श्रीलंकेला स्वातंत्र्य मिळाल्यावर तमिळी लोकांवर सर्वच क्षेत्रात अन्याय केला जाऊ लागला. त्यांना मूलभूत हक्कही मिळेनासे झाले. दहशतवादी कारवायामुळे तमिळींना श्रीलंकेत राहणेही अशक्य झाले. या अन्यायातून तमिळ राज्य स्थापन करण्यासाठी लढाऊ सशस्त्र संघटना निर्माण झाल्या. प्रभाकरनने एल.टी.टी.ई. या सशस्त्र गटाची स्थापना केली. छोटया संघटनांचे रूपांतर तमिळ युनायटेड लिबरेशन फ्रंटमध्ये झाले. एल.टी.टी.ई. ने जाफनाच्या जंगलभागात प्रशिक्षण केंद्रे उभारली. सरकारने सरसकट सर्वच तमिळींना कठोर शिक्षा केल्या. परिणामी तमिळी प्रशिक्षितांची संख्या १०,००० पर्यंत पोहोचली. तामिळनाडूतही अशी शिबीरे उघडली गेली. एल. टी.टी.ई. ने श्रीलंकेतसरकार व लष्करावर हल्ले सुरू करून प्रचंड दहशत निर्मा केली. १९८७ नंतर आत्मघातकी बॉंबस्फोट, गोळीबार ही दहशतवादाची कृत्ये सर्रास सुरू होती. श्रीलंकेच्या उत्तर भागाचा ताबा त्यांनी घेतला. त्यामुळे सरकारने व सिंहली लोकांनी तमिळावर अत्याचार सुरू केले. जाफना भाग एल.टी.टी.ई. ने घेतल्यामुळे सरकारने त्याच्याविरूध्द युध्द पूकारले मात्र गनिमी काव्याने सरकारला दहशतवाद्यांनी जेरीस आणले. शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारताने मदत करावी अशी श्रीलंकेने मागणी केली. त्यामुळे १९८७ साली एक लाख सैन्य भारताने अमेरिकेत पाठविले. मा. ते हात हालवत परतले. १२०० हिंदी सैन्य मारले गेले, २५०० जायबंदी झाले, ३०० कोटीचा चुराडा झाला. सतत एल.टी.टी.ई. व श्रीलंका सरकामध्ये संघर्ष सुरूच होता आणि आहे. त्यामध्ये सामान्य नागरिकांचे प्रचंड हाल झाले. कित्येकांना स्थलांतर करावे लागले. ओसामा बिन लादेन या कुख्यात दहशतवाद्याच्या अलकायदा संघटनेने नियोजित कट करून ११ सप्टेंबर २००१ रोजी न्युयार्क मधील वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या इमारतीवर दोन विमाने आदळली. दोन्ही टॉवर्स आगीत सापडले. या हल्ल्यात २९८६ लोक मरण पावले. त्यात १९ अपहरणकर्तेही होते.१६ डिसेंबर २०१४ पेशावरमधील एका आर्मी स्कूल मध्ये सात आत्मघातकी दहशतवाद्यांनी लक्ष्य करून १३२ शाळकरी मुलांसह १४१

जणांची हत्या केली. काहींना गोळ्या घालून ठार केले तर चार दहशतवाद्यांनी स्फोटकाच्या सहाय्याने स्वतःला उडवून देऊन जीवितहानी अधिकच वाढविली.

**समारोप –**

प्राचीन काळात ग्रीक, शक, पर्थियन, कुशाण टोळयांनी आक्रमण करून तेथील लोकांवर दहशत बसवून आपले प्रशासन चालविले. मध्ययुगात तुर्की, अरबी टोळयांनी भारताच्या वायव्य भागात आक्रमण करून तेथे दहशतीने आपले वर्चस्व निर्माण केले. एवढेच नव्हे तर संपूर्ण भारत ६०० वर्षे आपल्या दहशतीखाली आणून आपले प्रशासन चालविले. आधुनिक काळात तर दहशतवादी संघटनांची स्वतंत्र विचारसरणी, प्रकीया जास्तीत जास्त आक्रमक विनाशकारी, कुर, बेंडर होताना दिसते आहे. कॉम्प्युटर व इंटरनेटचा वापर कौशल्याने करून दहशतवादाने सर्व जगात थैमान घातले आहे. दहशतवादाची व्याप्ती वाढत चालली आहे. २०० हून अधिक दहशतवादी संघटना जगात आस्तित्वात आहेत. समाजातील असंतुष्टता हेच दहशतवादाचे मुळ आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या फ्रेंच राज्यक्रांतीच्या देणगीचा समाजाला विसर पडला असल्यामुळेच दहशतवादाचे स्वयप दिवसेंदिवस अधिक घातक बनत चालले आहे. असंतुष्टांची असंतुष्टता दूर करून त्यांना सामाजिक प्रवाहात आणल्यास दहशतवाद कमी होण्यास मदत होऊ शकेल.

**संदर्भ –**


१. सुभाष शिंदे, अजयकुमार लोखंडे, प्राचीन भारत, शेठ पब्लिशर्स मुंबई, २००७, पा. ८३.

२. कित्ता, ८५,८६.

३. धनंजय आचार्य, प्राचीन भारत, साईनाथ प्रकाशन नागपूर, २००४, पा. ११६, ११७.

४. कित्ता – पा. २३०, २३१.

५. कित्ता – पा. २४८, २४९.

६. जयसिंगराव पवार, भारताचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास, अरूंधती प्रकाशन कोल्हापूर, जुन २००६, पा. १७४.

७. म.न. उदगावकर,२१ व्या शतकातील दहशतवाद,डायमंड पब्लीकेशन पुणे,२००७,पा.२८– ३१.


❑❑❑